**प्रसिध्दीपत्रक दि. २४/०८/२०२३**

**विषय :- जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे यांचे तर्फे वाहतूक नियमांचे उल्लंघनासंदर्भात आयोजित "हेल्पडेस्कबाबत"**

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे यांचे तर्फे वाहतूक नियमांचे उल्लंघनासंदर्भात असलेले प्रलंबित चलन केसेसचा निपटारा करणे करीता पोलीस उप आयुक्त वाहतूक शाखा कार्यालय, बंगला नं. ६, येरवडा पोस्ट ऑफिस शेजारी, पुणे येथे दि. ०९/०९/२०२३ रोजी लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर लोक अदालतीचे अनुषंगाने दिनांक २४/०८/२०२३ रोजी पोलीस उप आयुक्त वाहतूक शाखा कार्यालय येरवडा, पुणे या ठिकाणी मा. सचिव, पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, शिवाजीनगर, पुणे व मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मोटार वाहन न्यायालय, शिवाजीनगर, पुणे यांचे समवेत बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार दि. २८/०८/२०२३ रोजीपासून वाहतूक शाखा कार्यालय, बंगला नं. ६, येरवडा पोस्ट ऑफिस शेजारी, पुणे येथे प्रलंबित वाहतूक चलनांचे तडजोडीनंतर दंडातील सवलतीबाबतच्या माहितीचा हेल्पडेस्क सुरु करण्यात येत आहे.

त्याअंतर्गत लोकहितासाठी व प्रलंबित खटल्यांची निर्गती करण्यासाठी नागरिकांचे वाहनांवरील प्रलंबित असलेले वाहतूक नियमांचे भंग केलेल्या चलनाची निर्गती तडजोडअंती सूट देवून करण्यात येणार आहे. ज्या वाहनचालकांच्या वाहनांवर वाहतूक नियमभंग केलेबाबत केसेस प्रलंबित आहेत, अशा वाहनचालक / मालक यांनी दि. २८/०८/२०२३ रोजी पासून सकाळी ११.०० ते १४.०० व १५.०० ते १७.०० या वेळेत पोलीस उप आयुक्त वाहतूक शाखा कार्यालय, येरवडा पुणे येथे येवून आपले वाहनावर असलेल्या प्रलंबित केसेसच्या निर्गतीचे अनुषंगाने उपस्थित राहिल्यास वाहन चालकांवरील प्रलंबित दंडाची रक्कम तडजोडीनंतर वाहन चालकांवरील दंड चलान कमी होईल.

**मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे संकल्पनेतून व मा.पोलीस सह आयुक्त, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली नागरिकांना 'जिल्हा हेल्प डेस्क' ही सुविधा उपलब्ध करण्यात येत आहे.**

24/8/2023

(विजयकुमार मगर)
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक,
पुणे शहर

**सर्व संबधितांना.**